ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

*No: CGRF/AZ/AUR/ U / 255 / 2009 /89 Date :-*

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,*
*Aurangabad.*

*Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Vishnu Maganlal Salampure, At post Golwadi Tq. & Dsist.Aurangabad. (Consumer No. 490011757593)*

*Dear Sir,*

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect of Shri Vishnu Maganla Salampure, At post Golwadi Tq. & Dsist.Aurangabad.*

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 24.11.2009 at 11= 30 Hrs. onwards.*

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

*Copy to:-*
Shri Vishnu Maganlal Salampure,
*At post Golwadi*
*Tq. & Dsist.Aurangabad.*

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२५५/२००९/८९**

**तक्रार दाखल दिनांक :- १०/११/२००९**
**निकाल दिनांक :- ०८/०१/२०१०**

**श्री विष्णु मगनलाल सलामपुरे,**
**मु.पो. गोलवाडी**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११७५७५९३) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**
**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |
| | **वि. सु. काबरा** | **सदस्य** |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १०/११/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २४/११/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) वीज ग्राहकाने महावितरण कंपनीकडुन दिनांक ३०/०९/२००६ रोजी घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. ग्राहकाचे मीटर घराच्या बाहेर दर्शनी भागावर बसविले आहे. त्यांना माहे डिसेंबर २००८ मध्ये मगील रिडींग ५२६ व चालु रिडींग १५६४ दाखवत १०३८ युनिटचे देयक देण्यात आले. वरील बाबतीत मीटर रिडींग चुकीचे असल्याबाबतची तक्रार महावितरणच्या कपनीच्या संबंधित कार्यालकडे केलेली आहे. परंतु त्याच्या तक्रारीची दखल न घेता त्यांना चुकीची व सरासरीवर आधारीत वीज देयके देण्यात आली.त्यामुळे ग्राहकाने या मंचात तक्रार दाखल करुन मीटर रिडींगनुसार सुधारीत वीज देयक देण्यात यावे, व झालेल्या मानसीक त्रासापोटी रुपये १०००/ नुकसान भरपाई देण्यात यावी, व मंचाचा निर्णय होईपर्यंत वीज पुरवठा खंडीत करु नये अशी विनंती मंचास केली.

२) दिनांक २४/११२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी श्री पी.आर तौर व वीज ग्राहक श्री सलामपुरे उपस्थित होते.ग्राहकाने वरील प्रमाणे त्यांची तक्रार कथन केली. नोडल अधिकारी यांनी सांगीतले की,ग्राहकाचे मीटर मंद गतीने फिरत आहे त्यामुळे त्याच्या मीटरची चाचणी करुन त्याच्या अहवालानुसार बिल दुरुस्त करुन देण्यात येईल. त्यांनी ग्राहकाचा स्थळ निरिक्षण अहवाल,तसेच आपले निवेदन सादर केले मंचाने नोडल अधिकारी यांना पुढील आदेशापर्यत ग्राहकाचा वीज पुरवठा खंडीत करु नये तसेच ग्राहकाचे मीटर चाचणी करुन त्याचा अहवाल, व सुधारीत वीज देयक प्रस्ताव सादर करण्यास सांगुन पुढील तारीख ०१/१२/२००९ रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक ०१/१२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी हजर होते व वीज ग्राहक गैरहजर होते.नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचा मीटर चाचणी अहवाल प्राप्त झाल नसल्याचे सांगुन मीटर चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर, देयक दुरुस्ती करुन अहवाल पुढील तारखेस देण्यात येईल असे सांगीतले.पुढील तारीख ०८/१२/२००९ रोजी ठेवण्यात आली.

४) दिनांक ०८/१२/२००९ रोजी नोडल अधिकारी प्रतिनिधी श्री पी.आर.खडके व वीज ग्राहक उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचा मीटर चाचणी अहवाल तसेच सुधारीत देयक प्रस्ताव मंचात सादर केला. दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकुण घेतल्यानंतर प्रकरण निकासाठी ठेवण्यात आले.

५) दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागद पत्रावरुन व ग्राहकाच्या सी.पी.एल. वरुन असे दिसुन येते की,त्यांना मीटर रिडींग न घेता सरासरी वीज आकारणीची वीज देयके देण्यात येत होती व ग्राहकाने त्याचा भरणा केलेला आहे. माहे डिसेंबर २००८ मध्ये मागील रिडींग ५२६ व चालु रिडींग १५६४ दाखवुन १०३८ युनिटचे रुपये ३४८९.४७ चे देयक देण्यात आले.ग्राहकाने वरील देयक चुकीचे रिडींगवर आकारण्यात आल्याबाबत ची तक्रार दिनांक ०७/०७/२००९ व ०७/०९/२००९ रोजी महावितरणच्या संबंधित कार्यालयात केली तसेच त्याने युनिर्वसल ट्रासफार्मर या फोटो मीटर घेणा-या कंपनीकडुन सुधारीत मीटर रिडींग वाचणाचे प्रमाण प्रत्र सुध्दा दिनांक ०४/०९/२००९ रोजी उपकार्यकारी अभियंता छावणी उपविभाग यांना सादर केले. वरील पत्रानुसार ग्राहकाचे माहे डिसेंबर २००८ मध्ये १५६ युनिट रिडिंग असल्याचे व नोव्हेंबर २००९ मध्ये ५२६ युनिट असल्याचे नमुद केले आहे. परंतु त्यांना मीटर रिडींगनुसार सुधारीत देयक देण्यात आले नाही. याउलट या मंचात तक्रार दाखल करेपर्यंत म्हणजे माहे आक्टोबर २००९ पर्यंत त्यांना चुकीची स्टेटस दाखवत सरासरी आकारणीची देयके देण्यात आल्याचे दिसुन येते. कनिष्ठ अभियंता यांनी दिनांक ३०/११/२००९ रोजी केलेल्या स्थळ निरिक्षणावरुन असे दिसुन येते की, ग्राहकाकडे फक्त तीन सी.एफ.एल. व दोन पंखे असा एकुण १८३ वॅाटस वीज भार जोडलेला

आहे. तसेच त्यांना ३० युनिट प्रति माह सरासरी आकारणी प्रस्तावीत केलेली आहे. मंचाच्या आदेशानुसार ग्राहकाचे मीटर दिनांक २८/११/२००९ रोजी बदली करण्यात आले त्यावेळी त्याची अंतीम रिडींग ५२६.४ अशी नोंदविण्यात आली आहे. मीटर चाचणी अहवालानुसार वरील मीटर योग्य गतीने फिरत असल्याचे नमुद केलेले आहे.त्यामुळे ग्राहकाने कनेक्शन घेतल्यापासुन (सप्टेंबर २००९) ते मीटर बदली (नोव्हेंबर २००९) पर्यंत ५२७ युनिटचा वापर केलेला असल्यामुळे,५२७ युनिट चे देयक करने योग्य होईल.

## आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास केलेली संपुर्ण वीज आकारणी रद्द करण्यात येत आहे त्याऐवजी माहे आक्टोंबर २००६ ते नोव्हेंबर २००९ पर्यंत फक्त ५२७ युनिटची वीज आकारणी करुन,सुधारीत वीज देयक देण्यात यावे.

२) ग्राहकाने यापुर्वी भरणा कलेल्या रकमेची वजावट सुधारीत वीज देयकातुन करावी.

३) सुधारीत वीज देयक देतांना कोणतेही व्याज व दंडाची आकारणी करु नये.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा कृती अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| प्र. अ. सगणे | विलासचंद्र सु. काबरा | विष्णु अं. हंबिरे |
| --- | --- | --- |
| सदस्य/सचिव | सदस्य | अध्यक्ष |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.**


क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२५५/२००९/८९/ दिनांक :-

प्रति,

श्री विष्णु मगनलाल सलामपुरे,
मु.पो. गोलवाडी
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००११७५७५९३)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/**२५५/२००९/८९** )

आपण दिनांक १०/११/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती,सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.